RNI. No. MAHMAR 2012/44267
वर्ष : ७, अंक : ४, जाने.-फेब्रु.-मार्च २०१९

# दर्याचा राजा

संपादक : पंढरीनाथ तामोरे, (साहित्याचार्य)

मूल्य २५ रुपये

अखिल भारतीय
मराठी साहित्य संमेलन



वर्ष : ७, अंक : ४
जानेवारी-फेब्रुवारी-मार्च २०१९
RNI. No. MAHMAR /2012/44267

# दर्याचा राजा

संपादक :
पंढरीनाथ भिमजी तामोरे
(साहित्याचार्य)
कार्यकारी संपादक :
जनार्दन पाटील (कवी)

## अनुक्रमणिका


- संपादकीय ........................ ३
- प्रजासत्ताक दिन आणि आजचा भारत
  प्राचार्य डॉ. बी. ए. राजपूत .................. ४
- २६ जानेवारी एक ऐतिहासिक क्षण
  प्रा. ऋतुजा राऊत/प्रा. रामदास येडे .......... ५
- व्हीलचेअर
  डॉ. रजनी अपसिंगेकर .................. ६
- सौजन्यशील साहित्यिक : नामदेव लोटणकर
  पंढरीनाथ तामोरे .......................... १०
- आठवणीतील आचरेकर सर
  प्रल्हाद नाखवा .......................... १२
- दप्तराचे ओझे
  हर्षवर्धन जोशी .......................... १४
- स्वाक्षरी पुराण
  डॉ. नेताजी पाटील ........................ १६
- सकारात्मकता : अमृतमहोत्सवी दादासाहेबांचे बलस्थान
  गौरी कुलकर्णी.......................... १७
- पिवळे, तांबूस ऊन कोवळे
  लक्ष्मण ढवळू टोपले ...................... १९
- हसता खेळता सागर
  प्रीती विष्णू बने .......................... २२
- मत्स्यसंपदेचे महत्त्व
  हरेश्वर मर्दे ................................ २३
- तारापूर एज्युकेशन सोसायटीच्या गौरवशाली अमृतमहोत्सवास मनापासून शुभेच्छा!
  पंढरीनाथ तामोरे .......................... २४
- यवतमाळ साहित्य सम्मेलन
  सुधाकर ठाकूर .............................. २६
- पुस्तक परिक्षण .............................. २८
  पसायदानाचे महत्त्व : यशवंत क्षीरसागर
  माझी आनंदयात्रा : रमाकांत ठाकूर
  तिरंगा : अल्ताफ कुडले
- काव्यांगण .................................. ३२
  अनंत विचारे, सदानंद डबीर, सदानंद संखे, प्रल्हाद खाड्ये, सदानंद बामणे, सुधाकर ठाकूर, रमाकांत ठाकूर, मधुकर तरे
- बालांगण .................................. ३३
  बंद शाळा : सुधाकर ठाकूर
- दर्यालाटा .................................. ३४
- अभिप्राय .................................. ३९
- सहवेदना .................................. ४०


वार्षिक वर्गणी
१५० रुपये
दिवाळी अंकासह

किंमत
२५ रुपये

आहे. प्रत्येक माणूस व त्याचा धर्म हा सहिष्णुतेचा असला पाहिजे. कोणत्याही धर्माचे तत्वज्ञान कधीच माणसा-माणसात दरी निर्माण करू शकत नाही. मानवाच्या कल्याण्यासाठी धर्म व धर्माचे तत्वज्ञान निर्माण झाले आहे. शिक्षणाने अधिक समृद्ध होऊन धर्मनिरपेक्ष सामाजिक समतेचा आदर्श निर्माण करायला हवा. २६ जानेवारी २०१९ च्या प्रजासत्ताकदिना बद्दल मी तमाम भारतीय नागरिकांना विनवितो की, आपल्या संविधानाचे पावित्र्य राखून देशाला सुराज्याकडे घेऊन जावू या. शिक्षण क्षेत्रातील मान्यवरांना विनंती करतो आमच्या शिक्षण व्यवस्थेने देशाच्या सार्वभौमत्वाचा व धर्मनिरपेक्षतेचा सन्मान करणारे मूल्य अभ्यासक्रमाचा एक भाग बनविले पाहिजे. सक्षम न्याय व्यवस्था निर्माण व्हावी यासाठी कायद्याच्या अभ्यासाचे किमान ज्ञान प्रत्येक नागरिकास मिळेल अशी देखिल व्यवस्था शिक्षणाच्या माध्यमातून झाली पाहिजे असे माझे प्रामाणिक मत आहे. नागरिकांमध्ये आत्मबल निर्माण करण्याची अपेक्षा देखिल शिक्षण व्यवस्थेकडून केली तरी ती अव्यवहार्य वाटणार नाही. ●

# २६ जानेवारी : एक ऐतिहासिक क्षण

ऋतुजा राउत/प्रा. रामदास येडे



भारत म्हणजे विविध प्राचीन संस्कृतींनी, विविध भाषा, जातीसमूह, धर्मसमूहांनी नटलेला देश आहे. अशा या भूमीवर प्राचीन काळापासूनच विविध शक्तिशाली साम्राज्याची राजवट राहिलेली आहे. १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात प्रारंभी ब्रिटीश इस्ट इंडिया कंपनीचे आणि इ.स. १८५७ च्या उठावनंतर ब्रिटीश शासनाचे वर्चस्व भारतावर प्रस्थापित झाले. या जुलुमी राजवटीला प्रतिकार म्हणून भारतीय स्वातंत्र्य चळवळ उदयास आली. या स्वातंत्र्य लढयाच्या योगदानाने १५ ऑगस्टची 'सोनेरी पहाट' उजाडली.

जरी १५ ऑगस्ट हा दिवस स्वातंत्र्य दिन म्हणून साजरा होत असला तरी त्या सोबतच २६ जानेवारी ह्या दिवसाला भारतीय गणराज्यात अनन्यसाधारण महत्व आहे. याचे कारण असे की, इ.स.१९१९मध्ये मोंटेग्यू-चेंम्सफर्ड कायद्यातील तरतुदींनुसार घटनानिर्मितीच्या कामकाजातून भारतीयांना वगळले गेले. या घटनेच्या विरोधात संपूर्ण भारतभर आंदोलने झाली. या विरोधाचे देशभर उमटलेले पडसाद लक्षात घेता इंग्रजांचे भारतमंत्री बर्कन हेड ने भारतीयांना स्वत:चे संविधान स्वत: लिहिण्याचे आवाहन केले. हे आवाहन स्वीकारून भारतीयांनी राज्यघटना निर्मितीसाठी मोतीलाल नेहरूंच्या अध्यक्षतेखाली एका समितीचे गठन केले. या समितीने 'नेहरू अहवाल' ब्रिटीश शासानापुढे सादर केला. मात्र, हा अहवाल ब्रिटीश शासनाने अमान्य केल्याने महात्मा गांधीजींच्या मार्गदर्शनाखाली भारतीय राजकीय पुढायांनी डिसेंबर १९२९ रोजी लाहोर येथे झालेल्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनामध्ये २६ जानेवारी १९३० हा दिवस 'पूर्ण स्वराज्य दिन' म्हणून साजरा करण्याचे घोषित केले. आणि म्हणूनच २६ जानेवारी १९३० हा दिवस 'पूर्ण स्वराज्य दिन' म्हणून भारतभर साजरा केला गेला. जरी भारतीय राज्यघटना २६ नोव्हेंबर १९४९ रोजी लिखित स्वरुपात पूर्ण झाली असली तरी २६ जानेवारी १९३० या दिवसाचे प्रतिक म्हणून २० वर्षानंतर २६ जानेवारी १९५० रोजी भारतीय राज्यघटनेची अंमलबजावणी करण्यात आली.

भारतीय राज्यघटना म्हणजे जगातील आदर्श मूल्यांचा समावेश असलेले एक सर्वोत्कृष्ट दस्तऐवज, की जे 'भारताचा अंतिम कायदा' म्हणून ओळखले जाते. भारतीय राज्यघटना ही सार्वभौमत्व, लोकशाही, समाजवाद, धर्मनिरपेक्ष, प्रजासत्ताक यांसारखी आदर्श तत्वे समाजाला प्रतीत करते. एवढेच नव्हे तर नागरिकांच्या सर्वांगीण विकासासाठी मुलभूत हक्क व मुलभूत कर्तव्य कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता बहाल करते.

अमेरिका आणि इंग्लंड या सारख्या प्रगत राष्ट्रांना देखील मतदानाचा अधिकार देशातील सर्व नागरिकांना समानतेने देण्यासाठी बराच काळ लोटावा लागला. मात्र भारत हा असा एक देश आहे की ज्या दिवशी भारतीयांना राज्यघटना बहाल करण्यात आली त्याच दिवशी देशातील सर्व प्रौढ नागरिकांना कोणताही भेद न मानता प्रौढ मतदानाचा अधिकार दिला गेला. राज्यघटनेतील या विविध तरतुदींमुळेच आज भारतीय गणराज हे एक जगातील 'सर्वात बळकट लोकशाही' असलेले राष्ट्र म्हणून ओळखले जाते.

गेल्या काही वर्षांमध्ये जागतिक स्तरावर कार्यरत असलेल्या संघटनांमध्ये भारताची सकारात्मक भूमिका लक्षात घेता भारताचा जागतिक महासत्ता बनण्याकडे जो कल दिसून येतो त्याचे श्रेय निश्चितच भारताची राज्यघटना व त्यातील आदर्श मुलतत्वांना जाते. ●